ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ११ आक्टोबर, १९५३ | अंक ४१

## विविध माहिती

**वृद्धावस्थेंत शरीरांत होणारे फरक**—सुप्रसिद्ध ब्रिटिश मोटार कारखानदार लॉर्ड नाफिल्ड ह्यांनीं स्थापन केलेल्या नाफिल्ड फौंडेशननें बर्मिंगहॅम व लीड्स विद्यापीठांना ५०,००० पौंडांची देणगी दिली आहे. वृद्धावस्थेंत मनुष्याच्या शरीरांत काय फरक होतात, त्यांचें संशोधन करण्याचें काम वरील विद्यापीठांनीं करावयाचें आहे.

**अरुंद रुळाचे रस्ते**—भारतीय सरकारचे वहातूक मंत्रि श्री. लाल बहादूर शास्त्री यांनीं असें जाहीर केलें आहे कीं, ह्यापुढें भारतीय सरकार अरुंद रुळाचे रस्ते बांधणार नाहीं. उलट, ज्या ठिकाणचे रेल्वेमार्ग अरुंद रुळाचे आहेत ते शक्य तेथें रुंद रुळाचे करण्याचें सरकारचें धोरण आहे.

**ललितकला ॲकॅडमी**—भारतीय सरकारनें संगीत, कला आणि साहित्य ह्यांना उत्तेजन देण्यासाठी तीन संस्था काढण्याचें ठरविलें आहे. त्याप्रमाणें ललितकला ॲकॅडमी ही संस्था लवकरच काढण्यांत येणार आहे. ह्या संस्थेसंबंधीचें प्राथमिक कामकाज दोन–तीन महिन्यांत पुरें होईल. संगीत नाटक ॲकॅडमी ही संस्था सुरू झालेली आहेच.

**देना बँकेच्या शाखा**—मुंबईच्या देना बँकेनें दसऱ्याच्या मुहूर्तावर दिल्ली येथें आपली शाखा उघडली आहे. बँकेच्या मुंबईत १६, गुजराथेंत १७, सौराष्ट्रांत १२, महाराष्ट्रांत १ , मध्यप्रदेशांत १, कलकत्त्यांत १ व दिल्लींत १ अशा शाखा आहेत. शाखांची एकूण संख्या ५९ आहे.

**बंगलोर जवळ विद्युत् केंद्र**—म्हैसूरचें सरकार बंगलोर जवळ ४५,००० किलोवॅट वीज निर्माण करणारें एक नवें विद्युत केंद्र बांधण्याचा विचार करीत आहे असें समजतें. ह्या केंद्रामुळें कावेरी नदीच्या पाण्यांत पावसाच्या अभावीं जो चढ–उतार होतो त्यावर नियंत्रण ठेवतां येईल असें सांगण्यांत येत आहे.

**निषिद्ध माल पाठविला?**—जॅन स्टॅक नांवाच्या एका ब्रिटिश व्यापाऱ्यावर एका अज्ञात कम्युनिस्ट राष्ट्राला युद्धोपयोगी माल पाठविल्याचा आरोप ठेवण्यांत आला आहे. ब्रिटनमध्यें अशा प्रकारचा हा दुसरा खटला आहे. त्यानें बॉलबेअरिंग्जनें भरलेलीं ११२ खोकीं पाठविलीं अशी वार्ता आहे.

**घरणांसाठी अवाढव्य यारी**—रशिआंतील व्होल्गा नदीवर वीज उत्पादन करण्यासाठीं जीं अनेक धरणें बांधण्यांत येत आहेत त्यावरील एकाच्या बांधकामांत वापरण्यासाठीं ५०० टन वजन उचलूं शकणारी अवाढव्य यारी तयार करण्यांत येत आहे. यारीला ३२ चाकें असून ती खास तयार केलेल्या रुळावरून सरकविण्यांत येणार आहे. अशाच आणखीहि कांहीं प्रचंड याऱ्या मुद्दाम बांधण्यांत येत आहेत.

**पोहे भाजण्याची शेगडी**—मध्य प्रदेश सरकारच्या उद्योगखात्यानें पोहे आणि बिस्किटें भाजण्यास उपयुक्त अशी एक नवीन प्रकारची शेगडी शोधून काढली असल्याचें समजतें. गव्हाचे पोहे तयार करण्याचें कामहि खात्यानें मोठ्या प्रमाणावर सुरू केल्याचें कळतें.

**भारताची खनिज संपत्ति**—भारताच्या खनिज संपत्तीचा विकास आणि वापर ह्या विषयासंबंधीं दिल्ली येथें भारतीय शास्त्रज्ञांनीं नुकतीच चर्चा केली. 'व्हर्मिक्युलेट' ह्या नांवाच्या खनिजाचा शोध भारतांत नव्यानेंच लागला आहे. ह्या खनिजाच्या विटांनीं बांधलेल्या भट्ट्या उच्च तपमानालाहि टिकतात. आतांपर्यंत ह्या विटा परदेशाहून आणाव्या लागत होत्या. शास्त्रज्ञांच्या बैठकींत खनिजांविषयी ६० निबंध वाचण्यांत आले.

**भांडवल–नियंत्रण सल्लागार मंडळ**—भारत सरकारनें भांडवल नियंत्रणासाठी एक सल्लागार मंडळ स्थापन केलें असून अध्यक्ष म्हणून श्री. रामस्वामी मुदलियार ह्यांची नेमणूक केली आहे. श्री. एस्. निजलिंगाप्पा, श्री. प्राणलाल देवकरण नानजी, श्री. सिंभ आणि श्री. बी. डी. सोमाणी ह्यांना मंडळाचे सभासद नेमण्यांत आलें आहे.

**भारताचें कॉफीचें उत्पादन**— १९३९ नंतरच्या मंदींत कॉफीच्या मळेवाल्यांचें संरक्षण करण्याच्या हेतूनें १९४० सालीं इंडियन कॉफी बोर्ड ह्या संस्थेची स्थापना करण्यांत आली. तेव्हांपासून भारतामधील कॉफीचा खप वाढला असून आतां दरवर्षीं २०,००० टन कॉफी देशांतच खपते, असा अंदाज करण्यांत आला आहे. कॉफीचें उत्पादनहि जवळ जवळ तितकेंच असल्यामुळें, बोर्डाची आतां आवश्यकता नाहीं असें मत व्यक्त करण्यांत येत आहे.

**आगगाडीच्या डब्यांचा कारखाना**—पेरांबूर येथील कारखान्यांत धातूचे बनविलेले संपूर्ण आगगाडीचे डबे अजून तीन वर्षांनीं भारतांतील रेल्वेना मिळूं शकतील, अशी माहिती रेल्वेमंत्री श्री. लाल बहादूर शास्त्री ह्यांनीं सांगितली आहे. हिंदुस्थान एअर क्रॅफ्ट फॅक्टरींतहि रेल्वेचे डबे तयार होत आहेत. परंतु सध्या रेल्वेच्या डब्यांच्या दुरुस्तीचा प्रश्न अधिक तांतडीचा झाला आहे असेंहि त्यांनीं सांगितलें.

### अर्थ

**—दिवाळी अंक—**

"अर्थ"चा दिवाळीचा मोठा अंक ४ नोव्हेंबर रोजीं प्रसिद्ध होईल.

त्यापूर्वीचा ( २८ ऑक्टोबरचा अंक ) प्रतिवर्षीप्रमाणें बंद राहील.

# पुण्यांतील "वेस्टर्न इंडिया हाऊस"

## पुणें शाखेचे मॅनेजर, श्री. कृ. ग. खांडेकर, एम. ए., ह्यांची मुलाखत

लक्ष्मी रोडवरून जातांना उंबऱ्या गणपतीनजीक कोणाचेंहि लक्ष वेधून घेईल व मनांत कुतूहल निर्माण करील अशी एक उंच, भव्य आणि सुंदर इमारत नुकतीच बांधून पुरी झालेली तुम्हास दिसेल.

विमाक्षेत्रांत महाराष्ट्रांत अग्रेसर असलेल्या वेस्टर्न इंडिया लाईफ इन्शुअरन्स कंपनीच्या पुणें शाखेची ही इमारत असून भारताचे उपराष्ट्रपति व जागतिक कीर्तीचे तत्त्वज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन् यांच्या हस्तें मंगळवार दि. २७ आक्टोबर १९५२ रोजीं तिचा उद्घाटन समारंभ होणार आहे.

तळघराशिवाय सहा मजली असलेली ही सीमेंट कॉंक्रीटची इमारत ८० फूट उंच असून तिचेसाठीं सुमारें ५॥ लक्ष रुपये खर्च करण्यांत आला आहे. फिक्या जांभळ्या व बदामी रंगाच्या संगमरवरी दगडांनीं सजविलेलें तळमजल्यावरील स्तंभ, मालाड दगडाचा आभास निर्माण करणारी बाह्य बाजूची सजावट, प्रत्येक मजल्यावरील फरसबंदीकरितां वेगवेगळ्या रंगाच्या टाईल्सचा उपयोग, विजेचा पाळणा व सर्व तऱ्हेच्या अधुनिक सुखसोयी हीं या इमारतीचीं ठळक वैशिष्ट्यें आहेत.

इमारतीला लाभलेल्या मध्यवर्ती स्थानामुळें ५ व्या मजल्यावरील गच्चीवरून चौफेर दिसणारा पुणें शहराचा व आसमंतांतील निसर्गाचा अत्यंत रम्य व विलोभनीय देखावा हेंहि या इमारतीचें एक हेवा वाटण्याजोगें वैशिष्ट्य आहे. हा मनोहर देखावा पाहण्याची संधि सर्व नागरिकांना लाभावी यासाठी कंपनीनें कांहीं दिवसांपूर्वी इमारत दाखविण्याची कांहीं व्यवस्था ठेवली तर सर्व पुणेंकर कंपनीचे आभारच मानतील.


येथाल सुप्रसिद्ध वास्तुशास्त्रज्ञ श्री. यू. एम्. आपटे, आर. सी. सी. तज्ज्ञ श्री. आर. डब्ल्यू. नेने व बांधणी कंत्राटदार श्री. एस. जी. फडके यांच्या कुशल मार्गदर्शनाखालीं ही इमारत तयार झाली.

सौंदर्य आणि भव्यता या दोन्ही दृष्टींनें पुण्यांत अजोड ठरेल अशी ही इमारत् प्रत्यक्ष पाहण्यासाठीं गेलों तेव्हां सहजगत्याच कंपनीच्या पुणें शाखेचे मुख्य अधिकारी श्री. के. जी. खांडेकर, एम. ए., यांची गांठ पडली. त्यांच्याशीं झालेल्या संभाषणांत पुणें शाखेची माहिती देतांना ते म्हणाले, "वेस्टर्न इंडियाची पहिली शाखा म्हणवून घेण्याचा मान पुण्याला मिळाला. त्याचप्रमाणें प्रत्यक्ष कार्याच्या क्षेत्रांतहि पुणें शाखा आघाडीवर राहिली आहे, हें सांगण्यास मला अभिमान वाटतो. येथील इतर विमा कंपन्यांच्या शाखांचें कार्यक्षेत्र प्रादेशिक आहे, पण आमच्या शाखेचें कार्यक्षेत्र फक्त पुणें जिल्ह्यापुरतें मर्यादित आहे. या पार्श्वभूमीवर पुणें शाखेचें कार्य अधिकच भरीव वाटावें असें आहे. ४२–४३ सालीं या शाखेमार्फत दरसाल मिळणाऱ्या नवीन कामाचा आंकडा ९ लाखाच्या घरांत होता, तो गेल्यासालीं २३ लाखांवर गेला. कामाचा उठाव मोठा असूनहि त्याप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाचें प्रमाण मात्र अत्यल्प म्हणजे १२ टक्केच आहे. पण ह्या दोनच गोष्टी असून भागत नाहीं. किंबहुना धोरणाची खरी कसोटी याहीपेक्षां कामाचा चांगला दर्जा ही आहे. त्यामुळें येणारे क्लेम्स व विमापत्रकें अकालीं रद्द होण्याचें प्रमाण ह्या दोन गोष्टी उत्कृष्ट विमा–कार्याच्या दोन महत्त्वाच्या कसोट्या मानल्या जातात; व त्याहि बाबतींत पुणें शाखा अग्रगण्य ठरली आहे.

( पृ. ३४९ पहा )


SAVE to help yourself and the NATION

WITH THE



HOME SAFE

THE SARASWAT CO-OPERATIVE BANK LTD.
GIRGAON, BOMBAY.
Branches: Dadar, Mahim, Poona & Belgaum


### 'अर्थ' ग्रन्थमाला.

1. बँका आणि त्यांचे व्यवहार
2. हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
3. व्यापारी उलाढाली
4. सहकार


दि

## युनायटेड कमर्शिअल बँक लि.

कलकत्ता.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | ८ कोटी रु. |
| खपलेलें भांडवल | ... | ४ कोटी रु. |
| वसूल भांडवल | ... | २ कोटी रु. |
| रिझर्व्ह फंड | ... | ७५ लक्ष रु. |

: बोर्ड ऑफ डायरेक्टर्स :

जी. डी. बिर्ला ( चेअरमन )

| | |
|---|---|
| ईश्वरीप्रसाद गोएंका<br>व्हाइस चेअरमन | रमणलाल जी. सरय्या<br>व्हाइस चेअरमन |
| अनंत चरण लॉ | महादेव एल. डहाणूकर |
| बैजनाथ जालन | मदनमोहन आर. रुइया |
| गोविंदलाल बंगूर | मोहनलाल एल. शहा |
| पी. डी. हिमतसिंगका | मोतीलाल तापुरिया |
| रामेश्वरलाल नोपानी | नवीनचंद्र मफतलाल |

: जनरल मॅनेजर :

बी. टी. ठाकूर

भारत, बर्मा, पाकिस्तान आणि मलाया येथील महत्त्वाच्या शहरीं व गांवीं बँकेच्या शाखा असल्यानें आणि बँकेच्या सबंध जगभर एजन्सीच्या व्यवस्था असल्यानें भारतांत व भारताबाहेर अत्युत्कृष्ट बँकिंगची सेवा करण्यास बँक सुसज्ज आहे.

# अर्थ

बुधवार, ता. २१ आक्टोबर १९५३



संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

## जागतिक बँकेचें १९५२–५३ मधील कार्य

जागतिक बँकेचा १९५२-५३ चा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. त्यावरून असें दिसून येतें कीं, मागासलेल्या देशांचा योग्य तो विकास होण्याच्या मार्गांत भांडवलाचा अभाव व यंत्रज्ञांचा अभाव या दोन मुख्य अडचणी आहेत. परंतु या दोन अडचणींव्यतिरिक्त लोकांमध्यें शिक्षणाचा अभाव, आर्थिक गोष्टींच्या बाबतींत निरुत्साह व लौकर फळ पदरांत पडावें या बाबतींत अतिशय उतावीळपणा, याहि गोष्टी मागासलेल्या देशांच्या विकासाच्या मार्गांत अडचणी आहेत असा उल्लेख जागतिक बँकेच्या गेल्या वर्षाच्या अहवालांत सांपडतो.

३० जून, १९५३ पर्यंत गरजू देशांना जागतिक बँकेनें १५६ कोटी डॉलर्स किंमतींचीं कर्जें दिलीं आहेत. यांपैकीं आशिया खंडांतील देशांना फक्त १८·७ कोटी डॉलर्सचें कर्ज दिलें आहे. युरोपांतील देशांना ७३·४ कोटी डॉलर्स व नव्या जगांतील देशांना ३५·७ कोटी डॉलर्स व ऑस्ट्रेलियाला १५ कोटी डॉलर्स याप्रमाणें बँकेनें कर्जें दिलीं आहेत. आशिया खंडांतील मागासलेल्या देशांना बँकेनें आतांपर्यंत फार तर १२ टक्के एकूण कर्जाच्या प्रमाणांत कर्जें दिलीं आहेत. हिंदव्यतिरिक्त आशियांतील इतर कोणत्याहि देशाला स्वतःची नियोजनाची योजना जागतिक बँकेला समाधानकारकपणें दाखवितां आलेली नाहीं. गरजू देशांनीं स्वतः एखादी योजना आंखून त्या योजनेच्या बाबतींत स्वतःला काय करतां येण्यासारखें आहे, तें ठरविलें पाहिजे. कांहीं देशांची प्रवृत्ति मोठाल्या विकासयोजना तयार करून त्यांच्यावर विशेष भर देण्याची दिसते, व हे देश जास्त फलदायी लहान–लहान योजनांकडे दुर्लक्ष करतात, असें बँकेचें म्हणणें आहे.

१९५१–५२ या वर्षी बँकेनें २९·९ कोटी डॉलर्स कर्जें दिलीं, परंतु १९५२–५३ मध्यें १७·९ कोटी डॉलर्स कर्जें दिलीं. १९५१–५२ मध्यें एकूण १६ देशांना कर्जें देण्यांत आलीं, परंतु गेल्या वर्षी फक्त ९ देशांना कर्जें देण्यांत आलीं. जागतिक बँकेजवळ जास्त पैसा असल्याशिवाय गरजू देशांना जास्त प्रमाणांत मदत देणें शक्य होणार नाहीं. फक्त अमेरिकेनेंच आपला ठराविक वांटा पूर्णपणें दिला आहे. पश्चिम युरोपांतील दहा देशांनीं बँकेला ५५·९ कोटी डॉलर्स देण्याचें कबूल केलें होतें, परंतु प्रत्यक्ष फक्त ६·३ कोटी डॉलर्स दिले. गेल्या वर्षी बँकेनें कॅनडा व स्वित्झर्लंड या देशांत बॉंड्स् विकून पैसे उभारले, परंतु अजूनहि गरजेच्या मानानें बँकेला पैसा अपुरा पडत आहे. व्याजाचा दर वाढविण्याचें आजचें अमेरिकन सरकारचें धोरण जागतिक बँकेच्या अध्यक्षांच्या मतानें फारसें योग्य नाहीं. मागासलेल्या देशांना अमेरिकेपेक्षा युरोपमध्यें पैसे उसने काढणें व माल खरेदी करणें या गोष्टी करणें परवडतें.

## सोन्याच्या बाजारभावाच्या उताराची शक्यता

खुल्या बाजारांतील सोन्याचा बाजारभाव चालू वर्षाच्या सुरुवातीला एक औंसाला ३७॥ डॉलर्स होता तो नुकताच सप्टेंबर महिन्यांत ३६॥ डॉलर्स इतका झाला आहे; म्हणजे दर औंसामागें तो सव्वा डॉलरनें उतरला. पॅरिसच्या बाजारांतहि सोन्याचा भाव उतरल्याची नुकतीच बातमी ऑक्टोबरचे सुरुवातीला आली आहे. सोन्याचा भाव चालू वर्षांत किंचित् उतरण्याचीं दोन कारणें दिसतात. एक कारण असें कीं, दक्षिण आफ्रिकेंत सोन्याचें उत्पादन थोडें जास्त होऊन तें खुल्या बाजारांत विकलें गेलें. कॅनडानेंहि आपलें एक तृतीयांश सोन्याचें उत्पादन खुल्या बाजारांत विकलें. चीनकडून हल्लीं सोन्याला मागणी नाहीं. सोन्याचें वाढतें उत्पादन व त्या मानानें मर्यादित मागणी, या गोष्टीमुळें सोन्याची किंमत उतरावयास मदत झाली आहे असें मानावयास हरकत नाहीं.

परंतु या बाबतींत विचार करण्यासारखें दुसरेंहि कारण आहे. तें राजकीय स्वरूपाचें आहे. आंतरराष्ट्रीय वातावरण हल्लीं बरेंच शांततेचें झालें आहे व नजीकच्या भविष्यकाळांत मोठ्या महायुद्धाची भीति नाहीं. याचाहि परिणाम सोन्याच्या बाजारभावावर झाला आहे. चालू वर्षाच्या मार्च महिन्यानंतर रशियाचें धोरणहि आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीनें किंचित् सौम्य बनलें आहे व त्याचाहि परिणाम सोन्याच्या भावावर अप्रत्यक्षपणें होत आहे.

सोन्याची किंमत उतरण्याला आणखीहि इतर गोष्टी कांहींशा कारण झाल्या आहेत. १९५२–५३ या वर्षी प्रथमच जगांतील लोकसंख्येची वाढ व जगांतील अन्नधान्याच्या उत्पादनाची वाढ यांत समप्रमाण दिसून आलें. यापूर्वी लोकसंख्येची वाढ धान्याच्या वाढीच्या मानानें जास्त होत असे. गहूं, साखर, कापूस, ताग व रबर या वस्तूंचे बाजारभाव निश्चितपणें उतरत आहेत, ही गोष्टहि एकंदर जगांत उत्पादन व पुरवठा या बाबतींत कांहीं तरी समाधानकारक स्थिति निर्माण झाल्याची द्योतक आहे. आजच्या जगाच्या दृष्टीनें अमेरिका आर्थिक व व्यापारी उलाढालींचें केंद्र मानलें जातें. कांहीं झालें तरी १९५३ व १९५४ हीं दोनहि वर्षें अमेरिकन अर्थव्यवहाराला सुखाचीं जाणार याबद्दल तज्ज्ञांचें एकमत दिसतें. मंदी आलीच तरी ती निदान १९५५ चे सुरुवातीपर्यंत येत नाहीं, असा माहितगार लोकांचा अंदाज आहे. अन्नधान्याचें उत्पादन, उद्योगधंद्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाचें उत्पादन, कारखानी मालाचें उत्पादन व व्यापार या दृष्टींनीं समाधानकारक स्थिति निर्माण झाली आहे, व जरी जागतिक व्यापारांत अडचणी निर्माण झाल्या तरी प्रत्येक देशाची अंतर्गत आर्थिक परिस्थिति कांहींशीं समाधानकारक राहील असें वातावरण निर्माण झालें आहे. या सर्व गोष्टी परिणामीं सोन्याची किंमत उतरण्याला थोड्याशा कारण होत आहेत.

## भारताच्या परराष्ट्रीय व्यापाराचें बदललेलें स्वरूप

सप्टेंबर, १९४९ मधील अवमूल्यनापासून, भारताच्या परराष्ट्रीय व्यापारांत हळूहळू बदल होत गेला आहे, हें खालीं दिलेल्या तक्त्यावरून स्पष्ट होईल. निर्गत व्यापारांत पक्क्या मालाचें प्रमाण वाढलें आहे, तर कच्च्या मालाचें प्रमाण उतरलें आहे. आयातींत अन्नपदार्थांत वाढ झालेली सुप्रसिद्धच आहे; पक्क्या मालाची आयात कमी झाली आहे.

१९४८-४९ मध्यें, निर्गतीपैकी ६६% माल तागाचे जिन्नस, चहा, कपास कापड, कच्चा ताग व कपास अशा फक्त पांच प्रकारचा होता. त्यानंतर कपास कापडाची निर्गत वाढून ती तागाच्या जिनसांचे खालोखाल झाली. युद्धसमाप्तीनंतर यंत्र-सामुग्रीची आयात वाढली.

अवमूल्यनाचा परिणाम परराष्ट्रीय व्यापारावर कितपत झाला, हें निश्चित सांगणें कठीण आहे. अवमूल्यनाचा तात्काळ परिणाम आयात-निर्गतींतील तफावत कमी होण्यांत झाला, हें खरें आहे. परंतु, त्यानंतरच्या तीन वर्षांत, भारताचा परराष्ट्रीय व्यापार फार कमी झाला. १९५२ मध्यें परराष्ट्रीय व्यापारांतील जिनसांची किंमत व नगांची संख्या दोन्ही उतरली. निर्गतीमधील घट आयातीमधील घटीपेक्षा जास्त भरली. निर्गत मालाच्या किंमती २३% उतरल्या, तर आयात मालाच्या किंमतींत फक्त ४% उतार झाला. आयातीवरील बंधनें बदलत जाणाऱ्या परिस्थितीप्रमाणें आवळावीं लागलीं.

भारतानें कित्येक देशांशीं व्यापारी करार केलेले आहेत. त्यामुळें, परराष्ट्रीय व्यापाराचा प्रवाह आतां पूर्वीप्रमाणें मोकळेपणानें वाहूं शकत नाहीं. निर्गत करणारा देश व आयात करणारा देश ह्यांच्या गरजांनुसार करार केले जातात व त्यामुळें इतर देशांशीं होणाऱ्या व्यापारावर साहाजिकच परिणाम होतो.

फाळणीमुळेंहि परराष्ट्रीय व्यापाराचा तोल बिघडण्यास मदत झाली आहे. निर्गत व्यापारांतील गळिताच्या धान्यांचें महत्त्व आतां फार वाढलें आहे; पूर्वी तें कमी होतें. ताग आणि चहा ह्यांचे खालोखाल त्यांना महत्त्व प्राप्त झालें आहे.

अतिपूर्वेकडील बाजारपेठेंत भारतीय मालास बराच वाव आहे. युनायटेड स्टेट्स किंवा युरोप ह्यांऐवजीं आतां अतिपूर्वेकडे आपल्या निर्गत व्यापाराचा ओघ वाढविला पाहिजे. आपल्या कपास कापडापैकीं दोन तृतीयांश कापड ह्या विभागांतच खपतें. युद्धापूर्वीं, जपानी स्पर्धा असतांहि भारताच्या निर्गत कापडापैकी ७०% कापड हा विभाग घेत असे.

## स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांचा वाढता खप

गेल्या कांहीं वर्षांत भारतांत स्टेनलेस स्टीलचीं भांडीं वापरण्याचा प्रघात पडूं लागला आहे. त्यामुळें तांब्या-पितळेचीं छोटीं भांडीं करणाऱ्या ग्रामोद्योगांना कसा धक्का बसला आहे, हें अहमदाबाद मेटल असोसिएशननें काढलेल्या पत्रकावरून दिसून येतें. असोसिएशनतर्फे ही माहिती सरकारी अधिकाऱ्यांना व इतर संबंधितांना पाठविण्यांत आली आहे. चालू व जुन्या उद्योग-धंद्यांना आधुनिक उत्पादन कसें मारक होतें, त्याचें हें आणखी एक उदाहरण आहे. हातमागाचें कापड गिरणींच्या कापडाच्या स्पर्धेपुढें टिकाव धरूं शकत नाहीं; तसेंच वरील उदाहरणाचें आहे. स्टेनलेस स्टीलच्या भांड्यांची आयातच थांबवावी असा उपाय कोणीं सुचविला तर तो योग्य होणार नाहीं. कारण, अशा तऱ्हेनें लोकांची आवड कोणी दाबूं शकणार नाहीं. तथापि, तांब्या-पितळेचीं भांडीं करणारे धंदे बंद पडून बेकारी माजण्याचा जो धोका उत्पन्न झाला आहे, त्याबाबत मात्र विचार करणें सरकारला भाग पडेल. असोसिएशनच्या माहितीप्रमाणें, शहरांतून स्टेनलेस स्टीलचीं भांडीं वापरणें अधिक प्रमाणांत दिसून येतें. शहरांतील जवळ जवळ २५ ते ५० टक्के कुटुंबांतून स्टेनलेस स्टीलचीं भांडीं वापरण्यांत येत आहेत. ग्रामीण भागांत सुद्धा ह्या भांड्यांचा शिरकाव झाला असून निदान १० टक्के कुटुंबांतून तरी तीं वापरलीं जात आहेत. आधुनिक उत्पादनतंत्रामुळें जे अनेक नवे प्रश्न उत्पन्न होत आहेत, त्यांतीलच हा एक आहे. पण खरा प्रश्न नवीन उत्पादक पद्धतीमुळें जुन्या धंद्यांत बेकारी उत्पन्न होते ती कशी टाळावी, हा आहे.

## दक्षिण रेल्वेच्या सल्लागारसमितीवर पुण्याचे व्यापारी श्री. साळवेकर यांची निवड

येथील दि पूना मर्चंटस चेंबरचे जॉइंट सेक्रेटरी व भवानी पेठेंतील भुसार मालाच्या सुप्रसिद्ध दुकानाचे मालक श्री. महादेव बाळकृष्ण साळवेकर यांची सदर्न (दक्षिण) रेल्वेच्या सल्लागार-समितीवर पुणें विभागातर्फे निवड करण्यांत आली आहे. श्री. साळवेकर यांच्या या नियुक्तीबद्दल पुणें येथील किराणा-भुसार व्यापारी असोसिएशनचे चिटणीस श्री. म. गो. कुलकर्णी यांनीं अभिनंदनपर पत्रक काढलें असून सदर्न रेल्वेवरील पुणें विभागांतील अडचणींची दाद लावण्याबाबत श्री. साळवेकर नक्की प्रयत्न करतील, अशी आशा व्यक्त केली आहे. श्री. साळवेकर यांच्या या नियुक्तीबाबत पुण्यांतील सर्व व्यापारी वर्गाकडून त्यांचें अभिनंदन होत आहे.

### एकूण परराष्ट्रीय व्यापारांत वेगवेगळ्या जिनसांचें स्थान

| निर्गतीपैकी % | १९३८ ते ३९ | १९४६ ते ४७ | १९४७ ते ४८ | १९४८ ते ४९ | १९४९ ते ५० |
|---|---|---|---|---|---|
| १ अन्न, पेयें व तंबाखू | २४·० | १९·५ | १९·३ | २१·० | २४·५ |
| २ कच्चा माल | ४५·० | ३१·० | ३१·७ | २३·५ | २२·० |
| ३ पक्का माल | २९·३ | ४६·० | ४८·२ | ५५·१ | ५३·० |
| इतर | १·७ | १·५ | ०·८ | ०·४ | ०·५ |
| | १००·० | १००·० | १००·० | १००·० | १००·० |

| आयातीपैकी % | १९३८ ते ३९ | १९४६ ते ४७ | १९४७ ते ४८ | १९४८ ते ४९ | १९४९ ते ५० |
|---|---|---|---|---|---|
| १ अन्न, पेयें व तंबाखू | १५·८ | ३३·८ | २६·७ | २४·३ | २०·७ |
| २ कच्चा माल | २१·८ | १९·९ | १९·० | ३०·७ | २९·७ |
| ३ पक्का माल | ६०·९ | ४४·४ | ५२·० | ४४·३ | ४८·८ |
| इतर | १·५ | १·९ | १·३ | ०·७ | ०·८ |
| एकूण | १००·० | १००·० | १००·० | १००·० | १००·० |

## आजची व्यापार व उद्योगधंदे यांची परिस्थिति

### तीव्र मंदीची भीति नाहीं

(मा. म. काळे)

आपल्या देशांतील आजचें व विशेषतः गेल्या तीन–चार महिन्यांतील उद्योग व व्यापार या बाबतींतलें वातावरण बरेंच चिंतनीय बनलें आहे. कापडाच्या बाबतींत भाव हळू हळू उतरत आहेत, परंतु जरूर त्या प्रमाणांत कापडाची परदेशांकडे निर्गतहि होत नाहीं किंवा दिवाळी व पूजा हे सण जवळ आले तरी अंतर्गत बाजारपेठेंत कापडाचा योग्य त्या प्रमाणांत खप होत नाहीं व यामुळें बरेंच कापड पडून आहे. अहमदाबादच्या कांहीं गिरण्या एक पाळी बंद करण्याच्या विचारांत आहेत, अशी बातमी आहे. माजी टेक्स्टाइल कमिशनर श्री. बॅरट यांनीं ऑक्टोबरचे सुरुवातीला विचारपूर्वक असें मत जाहीर केलें आहे कीं, कापडाच्या किंमती गिऱ्हाइकाच्या आटोक्यांत आल्याशिवाय आजचा प्रश्न सुटणार नाहीं. श्री. बॅरट यांनीं व्यक्त केलेलें मत कापडापुरतेंच असलें तरी अशा प्रकारची परिस्थिति ज्या इतर विक्रीमालाच्या बाबतींत आढळून येते, त्या प्रत्येक बाबतींतच बाजारभाव गिऱ्हाइकाच्या क्रयशक्तीच्या मर्यादेंत आल्याशिवाय आज उद्भवलेली परिस्थिति सुधारणार नाहीं. कापड, साखर, साबण, प्लॅस्टिक्सचा माल, गहूं, सायकली, इत्यादि बाबतींत आज सांठा विपुल आहे; परंतु गिऱ्हाइकाला माल विकत घेणें परवडत नसल्यामुळें माल पडून आहे व म्हणून मालाचे उत्पादक व व्यापारी यांची परिस्थिति चिंतनीय बनली आहे.

सध्यां एकच गोष्ट किंचित् आशाजनक दिसते, ती ही कीं वस्तूंच्या किंमती अगदीं अल्प प्रमाणांत उतरत आहेत. सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतींचा निर्देशांक ऑगस्टमध्यें एका आठवड्यांत ४११ पर्यंत चढला होता तो सप्टेंबर महिन्यांत सरासरी ४०३·८ पर्यंत उतरला व अगदीं अलिकडे ३९८·७ इतका झाला आहे. परंतु वस्तूंचे बाजारभाव सामान्य जनतेच्या क्रयशक्तीच्या आटोक्यांत इतक्यांत येतील असें मात्र मुळींच नव्हे. बाजारभावांची ही परिस्थिति किंचित् सूचक मानली पाहिजे. यापुढें परिस्थिति जास्त बिघडणार नाहीं, एवढें निश्चित.

हल्लींचें औद्योगिक वातावरण मंदीचें निदर्शक आहे किंवा काय, याचा थोडक्यांत विचार करूं. कांहीं मालाचा विपुल पुरवठा व बेकारी या मंदीच्या वेळीं सामान्यपणें दिसून येणाऱ्या गोष्टी आज आहेत. परंतु मंदीच्या वेळीं देशांतील चलनाची क्रयशक्ति चांगली असते ती परिस्थिति आज मुळींच नाहीं. १९२९–३९ या मंदीच्या काळांत सर्व वस्तूंचे बाजारभाव कल्पनातीत उतरले होते, व रुपयाची क्रयशक्ति चांगली होती. सध्यांच्या परिस्थितीचा विचार केला असतां असें स्पष्टपणें दिसून येतें कीं, सामान्य जनतेची क्रयशक्ति मोठ्या प्रमाणांत कमी झाल्यामुळें बाजारांत कांहीं माल पडून आहे. याचें साधें प्रत्यंतर हें कीं १९३९ च्या पूर्वी कांहीं वर्षें दर माणशीं दर वर्षी १६ वार कापड वांटणीस येत होतें व तें खपत होतें, परंतु अलिकडे दर माणशीं दरवर्षी ११ वार कापड वांटणीस येत असून पुष्कळसें कापड विकलें न जातां बाजारांत पडून आहे. लोकांजवळ पैसा नाहीं म्हणून ते गहूं, साखर किंवा इतर आवश्यक माल गरज असूनहि विकत घेऊं शकत नाहींत. ही स्थिति मंदीची निदर्शक नव्हे. १९५२ च्या फेब्रुवारी–मार्च महिन्यांत कांहीं पदार्थांचे भाव एकदम खाली आले. परंतु रिझर्व्ह बँकेनें स्वीकारलेल्या योग्य धोरणामुळें तीन महिन्यांतच भाव पुन्हां चढूं लागले व जून–जुलै १९५२ मध्यें ते योग्य त्या पातळीपर्यंत चढले. त्यानंतर सतत एक वर्ष भाव अल्प प्रमाणांत वाढत गेले व सर्वसामान्य वस्तूंच्या किंमतींचा निर्देशांक ३८० पासून ऑगस्ट १९५३ च्या एका आठवड्यांत, ४११ पर्यंत चढला. परंतु मार्च १९५२ मध्यें तात्पुरते भाव उतरले असतांना तो ३६५ पर्यंत उतरला होता. आपल्या निर्गत मालापैकी इतर देशांचें उत्पादन वाढल्यामुळें चहाची निर्गत कमी होत आहे, आंतरराष्ट्रीय परिस्थिति सुधारल्यामुळें तागाची निर्गत बरीच कमी झाली आहे, व विशेषतः जपानच्या स्पर्धेमुळें कापडाची निर्गतहि ३० टक्क्यांनीं उतरली आहे. निर्गतीच्या बाबतींतील कमकुवत परिस्थिति व अंतर्गत बाजारपेठेंत सामान्य जनतेच्या घटलेल्या क्रयशक्तीमुळें मालाला मागणी नाहीं अशी आपत्ति कांहीं उद्योगधंद्यांच्या बाबतींत निर्माण झाली आहे.

त्यामुळें व्यापारहि मंदावला आहे. याचा परिणाम विमा कंपन्यांच्याहि व्यवहारावर झाला आहे. रेल्वेचें उतारूंच्या वाहतुकीचें उत्पन्नहि गेल्या वर्षांच्या मानानें यंदा कमी झालें आहे. १९५२-५३ या वर्षाचे बहुतेक सर्व कारखान्यांचे अहवाल नफ्याचें प्रमाण कमी झालें आहे किंवा तोटा झाला आहे असें दाखवितात. याच्यांतच सुशिक्षितांतील नोंदल्या गेलेल्या बेकारांची संख्या सुमारें पांच लाखांपर्यंत पोंचली आहे.

परंतु दूरवर विचार केला असतां आजची परिस्थिति मंदीची निदर्शक नव्हे असें म्हटलें पाहिजे. उद्योगधंद्यांच्या विशिष्ट अडचणींमुळें व गिऱ्हाइकाच्या घटलेल्या क्रयशक्तीमुळें आजची स्थिति उद्भवली आहे. पंचवार्षिक योजनेचा कार्यक्रम जोरांत चालू आहे, व बेकारीच्या निवारणार्थ आणखी १५० कोटी रु. पुढील अडीच वर्षांत खर्चिले जाणार आहेत. मजुरांचे संप अगदीं कमी प्रमाणांत होत आहेत. गेल्या पावणेदोन महिन्यांत सर्वसाधारण वस्तूंच्या किंमतींचा निर्देशांक ४११ वरून ३९८·७ पर्यंत उतरला आहे. रिझर्व्ह बँकेचें व व्यापार–उद्योगधंदे व अर्थखातें यांचें धोरण सावधगिरीचें असून शक्य तेथें उद्योगधंदे व व्यापार यांना मदत करण्याचें आहे. चहाच्या मळ्यांच्या बाबतींत व व्यापाऱ्यांना मालाच्या तारणावर पैसा उपलब्ध करून देण्याच्या बाबतींत हें धोरण दिसून आलेंच आहे. ऊंस व पोलाद यांच्या किंमतींत योग्य ती वाढ करण्यांत आली आहे. आर्थिक व चलनविषयक धोरणाच्या दृष्टीनें १९२९ च्या मानानें सरकार जास्त शहाणें बनलें आहे व आर्थिक जीवनावर अनेक प्रकारें प्रभावी नियंत्रण ठेवलें जात आहे. आर्थिक विचारांतहि नियंत्रित जीवनाच्या दृष्टीनें मौलिक भर पडली आहे. आयात–निर्यात व्यापार व भांडवलाची गुंतवणूक यांवरहि नियंत्रणें आहेत. इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट बिलामुळें कारखानदारांनाहि एकदम कारखाने बंद करतां येणार नाहींत, व कारखान्यांवर जरूर तेव्हां सरकारला प्रभावी नियंत्रण ठेवतां येत आहे. आर्थिक धोरणाच्या बाबतींतील या गोष्टी विचारांत घेतल्या म्हणजे मंदीचें संकट कायम स्वरूपांत उद्भवेल असें वाटत नाहीं, तर उलट मंदीचा संभव असल्यास सावधगिरीच्या धोरणामुळें तोहि संभव दूर होईल. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे निदान १९५५ पर्यंत अमेरिकेंत उद्योगधंद्यांची व व्यापाराची स्थिति समाधानकारक राहील व मंदी उद्भवणार नाहीं, असें अनेक तज्ज्ञांचें मत दिसतें. जागतिक युद्धाची भीति तात्पुरती नष्ट झाली तरी सर्व राष्ट्रें आपली आर्थिक परिस्थिति नियंत्रणें व योजनाबद्ध व्यवहार या मार्गांनीं सुधारण्याचा प्रयत्न करतील. सारांश, मंदीची भीति बाळगण्याचें कारण नाहीं असा आशावाद करावयास अनुकूल परिस्थिति दिसते.

# दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना १९११

मुख्य कचेरी : ९, बँक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई.

टेलिफोन नं. २५४६१ / ३१,६८६ | पोस्ट बॉक्स नं. ४७२ / तारेचा पत्ता : फार्मबँक

ह्या बँकेंत गुंतविलेला पैका शेतकरीवर्ग व सर्व प्रकारच्या सहकारी संस्था ह्यांच्याच उपयोगांसाठी दिला जातो.

भरपाई झालेलें भांडवल

| | |
|---|---|
| भागीदारांतर्फे | रु. ३३,९९,१५० |
| मुंबई सरकारतर्फे | रु. १६,००,००० |
| | रु. ४९,९९,१५० |
| गंगाजळी व फंड | रु. ५४,३३,९०० |
| ठेवी | रु. ९,२५,२६,५०० |
| खेळतें भांडवल | रु. १२,२९,०२,८०० |

## १६ जिल्ह्यांमध्यें ६७ शाखा

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था केली जाते. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तींबद्दल चौकशी करावी.

वा. पु. वर्दे
ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर.

**१९५० अखेरचें ११ वें यशस्वी मूल्यमापन**

१९५० मध्येंही रु. २६५ लाखांवर नवीन विम्याचें पूर्ण काम.

# वे स्ट र्न इं डि या

विमा कंपनीनें

आपलें सामर्थ्य, स्थैर्य व सेवा

यासंबंधीची प्रचीति पुन्हां एकवार विमा जगतास आणून दिली आहे.

दर हजारी त्रैवार्षिक बोनस

| ह्यातींतील पॉलिसी | ह्यातीनंतरची पॉलिसी |
|---|---|
| रु. २७ | रु. ३३ |

कंपनीच्या वाढत्या वैभवांत सहभागी व्हा व सर्वोत्कृष्ट फायद्यासाठी वेस्टर्न इंडियाची निवड करा.

के. वाय. जोशी, बी. ए., एफ. आय. ए.
मॅनेजर

# वेस्टर्न इंडिया लाईफ
## इन्शुअरन्स कंपनी लि. सातारा.

शाखा कचेरीः— शहर: १७९ बुधवार पेठ, लक्ष्मीरोड, पुणें. कँप: केअर-ऑफ क्रेसवेल्स ईस्ट स्ट्रीट, पुणें-१

फोन नंबर— ३४०२

# दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | २०,१२,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल्. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B.
मॅनेजर

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना १९३० : शेड्यूल्ड बँक

दक्षिण महाराष्ट्र व उत्तर कर्नाटकमधील पहिली शेड्यूल्ड बँक

शाखाः—संकेश्वर, होसूर (पो. शहापूर), गोकाक, कँप (बेळगांव), वेंगुर्लें, मालवण, नंदगड, गडहिंग्लज, रामदुर्ग, चिकोडी, नरगुंद, शिरोडा, चिपळूण, कणकवली, निपाणी, बैलहोंगल, मिरज, अथणी, देवगड, सावंतवाडी, ठळकवाडी (बेळगांव), सौंदत्ती.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | रु. १,९०,००० |
| ठेवी | रु. ७९,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. ९२,९३,००० |

बेळगांव येथें बँकेच्या स्वतःच्या मालकीच्या इमारतीमध्यें अद्ययावत पद्धतीचा सेफडिपॉझिट व्हॉल्ट १० एप्रिल, १९५१ पासून सुरू झाला.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

जी. एल. गजेंद्रगडकर, चेअरमन.
ए. आर. नाईक, मॅनेजिंग डायरेक्टर.
एच्. एस्. कुलकर्णी, मॅनेजर.

मूळ पॉलिसी देण्याचें काम सोडल्यास, विमेदारांचें कर्ज, वयमान्यता, विम्यांतील बदल वगैरे सर्व तऱ्हेचे विमाविषयक व्यवहार या शाखेमार्फत होत असल्यानें पुणें शाखेची कचेरी ही एक कंपनीची स्वयंपूर्ण कचेरी आहे असें मानावयास हरकत नाहीं. कंपनीच्या पॉलिसी–होल्डर्सची पुण्यांतील संख्या १०००० च्याहि पलीकडे आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर चाललेल्या या कामासाठी पुणें शाखेच्या दर्जाला शोभेल अशा एका स्वतंत्र इमारतीची फारच गरज होती व ती या इमारतीनें पूर्ण झालेली आहे."

पुणें शाखेचें काम लवकरच २५ लाखावर नेण्याचा संकल्पहि श्री. खांडेकर यांनीं बोलून दाखविला. उद्घाटन समारंभाप्रीत्यर्थ ५ लाखांचें जादा काम उद्घाटनाचे दिवशींच दाखल करण्याची महत्त्वाकांक्षाहि त्यांनीं प्रकट केली. खाजगी मालमत्तेचा विश्वस्त म्हणून सांभाळ करणारी वेस्टर्न इंडिया ट्रस्टी ॲण्ड एक्झिक्युटर कंपनी लिमिटेड हें वेस्टर्न इंडिया विमा कंपनीचें एक छोटें भावंड असून तिचे पुणें शाखेमार्फत दरमहा सुमारे चार हजार रुपये भाडें येणाऱ्या इमारतींची विश्वस्त म्हणून व्यवस्था पाहिली जाते.

जनतेचा विश्वास संपादन करून कंपनीला लाभलेल्या प्रतिष्ठेचे एक अगदी सामान्य पण नमुनेदार उदाहरण सांगतांना श्री खांडेकर म्हणाले, नवी इमारत ज्या ठिकाणीं बांधण्यांत आली तेथें पूर्वी पुराणिकांचा वाडा होता. तेथील भाडेकरूंची गैरसोय होऊं नये म्हणून कंपनीनें टिळक रोडजवळ चिमणबागेंत वेस्टर्न इंडिया सदन ही नवी इमारत बांधून अत्यंत सवलतीच्या भाड्यांत त्यांची येथें सोय केली.

नव्या इमारतीच्या उद्घाटन समारंभाला कंपनीच्या पुण्यांतील सर्व पॉलिसी–होल्डर्सची व हितचिंतकांची सोय व्हावी अशी आमची फार इच्छा होती. पण जागेच्या अभावीं सर्वांची योग्य सोय होणें सुलभ होणार नाहीं यामुळें मनाला वाटणारा खेद श्री. खांडेकर यांनीं मजजवळ बोलतांना व्यक्त केला. करितां स्वतंत्र दिवशीं पुनः एक पानसुपारी समारंभ करण्याचा आपला विचार असल्याचें त्यांनीं प्रकट केलें.

### भारत–पाकिस्तान व्यापारी करार

भारत सरकारला पाकिस्तान सरकारनें अशी विनंति केली आहे कीं, ऑगस्ट १९५२ मध्यें उभय राष्ट्रांत जो व्यापारी करार झाला आहे त्याची मुदत चालू वर्षअखेरपर्यंत वाढविण्यांत यावी. कराराची मुदत ३० सप्टेंबर, १९५३ ला संपली आहे.

### सहकारी चर्चा मंडळाचा वाढदिवस

सहकारी चर्चा मंडळाचा पांचवा वाढदिवस दि. १७–१०–५३ रोजीं, विजयादशमीस, साजरा करण्यांत आला. त्यावेळीं श्री. मोतीराम नारायण पाटसकर ह्यांचा सत्कार करण्यांत आला व त्यांचें "परदेशांतील सहकारी जीवन" ह्या विषयावर व्याख्यान झालें.

### "पुणें येथील वेस्टर्न इंडिया हाऊस"

वेस्टर्न इंडिया विमा कं. लि., सातारा ह्या विमासंस्थेचा, पुणें येथील नव्या इमारतीचा उद्घाटन समारंभ मंगळवार, ता. २७ ऑक्टोबर रोजीं डॉ. एस. राधाकृष्णन्, ह्यांच्या हस्तें होणार आहे. ही इमारत लक्ष्मीरोडवर उंबऱ्या गणपती चौकांत आहे.


दि
बँक ऑफ महाराष्ट्र लि.
स्थापना १९३५

—भांडवल—
रिझर्व्ह व इतर फंड :: रु. सहा लक्ष, सोळा हजार
एकूण खेळतें भांडवल :: रु. तीन कोटी पन्नास लक्षाचे वर

संचालक मंडळ
श्री. वा. पुं. वर्दे (अध्यक्ष) — श्री. श्री. गो. मराठे (उपाध्यक्ष)
श्री. धों. कृ. साठे — श्री. न. ग. पवार
श्री. मा. रा. जोशी — श्री. फ. दो. पदमजी
श्री. मा. वी. शहा — श्री. शं. ल. किर्लोस्कर
श्री. भा. म. गुप्ते

मुख्य कचेरी : थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.
चिं. वि. जोग, मॅनेजर.

दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.
—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.
आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.
एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

किर्लोस्कर
पॉवरवर चालणारे

"शरद चरक"

वसंत नं. ३ चरक
उसांचे चरक
हंगाम नजीक आला!
—सविस्तर माहितीसाठी आजच लिहा.—
किर्लोस्कर बंधु, लि., किर्लोस्करवाडी (जि. द. सातारा)

**राष्ट्रीय योजनेच्या खाजगी क्षेत्रांतील भांडवलाची गुंतवणूक**

राष्ट्रीय योजनेच्या कार्यवाहींत खाजगी क्षेत्राला नियोजन मंडळानें महत्त्वाचें स्थान दिलें आहे. मात्र नियोजन मंडळानें आपल्या प्रतिवृत्तांत अपेक्षिलेल्या पातळीपर्यंत या क्षेत्रांतील गुंतवणूक झालेली नाहीं. भांडवल उभारणीवर आणि उत्पादक धंदे चालू ठेवणें व त्यांचा विकास यांवर कराच्या पातळीच्या व स्वरूपाच्या होणाऱ्या परिणामांबाबत कर चौकशी मंडळ तपासणी करीत आहे. तरी देखील, खासगी क्षेत्रांतील भांडवल गुंतवणुकीवर परिणाम करण्याइतक्या गोष्टी आहेत. कर चौकशी मंडळापुढें विचारार्थ असलेल्या साधनाखेरीज इतर साधनांद्वारें या क्षेत्रासाठी अधिक भांडवल कसें उपलब्ध होईल याची तपासणी करण्यासाठी एक समिति नेमण्याचें रिझर्व्ह बँकेनें, सरकारच्या सल्ल्यानें, ठरविलें आहे. विशेषत्वें, खासगी क्षेत्रांस मोठ्या प्रमाणावर बँकांच्या भांडवलाची तरतूद करण्याच्या प्रश्नाच्या शक्याशक्यतेची ही समिति तपासणी करील.

या समितींत पुढील सदस्य असतील:— सर्वश्री. ए. डी. श्रॉफ, टाटा सन्स लि. चे डायरेक्टर; मुंबई ( अध्यक्ष ); जे. व्ही. जोशी, कार्यकारी संचालक, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई; एस. अनंत रामकृष्णन्, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मद्रास शाखेच्या स्थानिक मंडळाचे सदस्य; सी. डब्ल्यू. मिडलटन, इंपिरियल बँक ऑफ इंडिया, मुंबईचे कार्यवाह व खजिनदार; बी. टी. ठाकूर, युनायटेड कमार्शिअल बँक लि. कलकत्ता, चे जनरल मॅनेजर; व्ही. आर. सोनाळकर, इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया, नवी दिल्लीचे कार्यकारी संचालक; बी. के. दत्त, युनायटेड बँक ऑफ इंडिया लि. चे जनरल मॅनेजर; एम. एस. नाडकर्णी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मुंबई, बँकिंग विकासखातें; आणि डॉ. के. एस. कृष्णस्वामी, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मुंबईचें संशोधन व आंकडेवारी खातें.

संयुक्त कार्यवाहः— श्री. नाडकर्णी व डॉ. कृष्णस्वामी


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

— जपानी पद्धतीनें —
भाताचें उत्पादन वाढवितां येतें.

ठेवीच्या पद्धतीनें
**सिंडिकेटला साखरेचें उत्पादन वाढवितां येतें.**
★ ठेवीदारांना ६ ते ७ टक्के व्याज देतां येतें. ★

**दिपवाळीनंतर म्हणजे दीड महिन्यांनीं**
**नवीन हंगामाची साखर करण्यास सुरुवात होईल.**

— साखर-विक्रीवर सरकारी नियंत्रण असेपर्यंत —
**बँकेचें कॅश क्रेडिट किंवा ठेवीदारांच्या ठेवी घ्याव्या लागतील.**

**ठेवींचे व्याजाचे दर**
★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ ( सात ) टक्के.
★ मुदत एक वर्ष — व्याज ६ ( सहा ) टक्के.

ठेवींचे फॉर्म पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. ६-१०-१९५१.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल.
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.